महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : काऔसंवि/ब/वैद्यकीय तपासणी/ १८४३७ दिनांक : १६.०६.२०११

प्रति
मुख्य अभियंता ,
अमरावती परिमंडळ, अकोला/ औरंगाबाद/ नागपूर ग्रामीण/ नागपूर शहर / नाशिक / कोल्हापूर / कल्याण / रत्नागिरी / लातूर / पुणे / भांडूप / नांदेड / जळगांव / बारामती.

विषय : कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता विविध रुग्णालयामार्फत आयोजित केले जाणारे मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर मंडल/विभाग स्तरावर आयोजित करण्याबाबत.

संदर्भ : सांघिक कार्यालयाचे पत्र क्र. काऔसंवि/३३४९९ दि. ०१/११/२०१०.

**********

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महावितरण कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी आणि त्याच्या कुटूंबियांकरीता मोफत वैद्यकीय तपासणीची सुविधा तो काम करीत असलेल्या ठिकाणी त्यास उपलब्ध व्हावी व कर्मचाऱ्याने काम करत असताना तणाव मुक्त राहून निरोगी रहावे, यास्तव कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी मंडल/विभाग स्तरावर मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित करण्याबाबत सांघिक कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भांकित पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. यासंदर्भात दि.०४/०६/२०११ रोजी मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या स्तरावर झालेल्या आढावा बैठकीमध्येही योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

याबाबत आपणास सूचित करण्यात येते की, मोफत वैद्यकीय चिकित्सा शिबीर आयोजित करताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१) मोफत वैद्यकीय तपासणी शिबीरात होणाऱ्या वैद्यकीय चाचण्या ह्या मोफतच केल्या जाव्यात त्याबद्दल कोणातेही शुल्क (Fee) कंपनीने किंवा कर्मचाऱ्याने संबंधित रुग्णालयाला देऊ नये.
२) मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित करण्यासाठीचा खर्च कंपनीने करावा.
३) सर्वसाधारणपणे खालीलप्रकारच्या वैद्यकीय चाचण्या मोफत करुन घेणे आवश्यक आहे.
   अ) रक्त व लघवी यातील साखरेचे प्रमाण
   ब) ई.सी.जी.
   क) रक्तदाब
   ड) थायरॉईड (महिलांसाठी)
   इ) सर्वसाधारण वैद्यकीय सल्ला.
४) वरीलपैकी काही चाचण्या मोफत करुन देण्यास संबंधित रुग्णालयाची तयारी नसल्यास तथापि अशा चाचण्या सवलतीच्या दरात करुन देण्याची रुग्णालयाची तयारी असल्यास अशा सवलतीच्या दरातील चाचण्या संबंधित रुग्णालयात जावून करुन घ्याव्यात. त्यासाठी महावितरण कंपनीकडून कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

५) सदर शिबिराची सूचना कमीत-कमी १५ दिवस अगोदर सर्व कर्मचाऱ्यांना मिळेल अशी व्यवस्था करावी. तसेच जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांची (विशेषतः वाहिनीवर काम करणारे व तांत्रिक कर्मचारी) मोफत वैद्यकीय तपासणी होईल असे पहावे.

६) सदर मोफत वैद्यकीय तपासणी शिबीरे विभागीय स्तरापर्यंत आयोजित करण्यात यावीत.

सदर सुविधा ही कर्मचारी /विविध कामगार संघटना यांच्या सहभागातून राबविण्यात यावी. तसेच परिमंडळांनी वैद्यकीय तपासणी शिबिरे आयोजित करण्याबाबतचा अहवाल ह्या कार्यालयास दि. ५ जुलै, २०११ पर्यत पाठवावा.

राहुल गोवर्धन

कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रत:

१) मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व प्रशिक्षण), महावितरण, सुरक्षा व प्रशिक्षण केंद्र, एकलहरे, नाशिक.

२) उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, अमरावती परिमंडळ, अकोला/ औरंगाबाद/ नागपूर ग्रामीण/ नागपूर शहर / नाशिक / कोल्हापूर / कल्याण / रत्नागिरी / लातूर / पुणे / भांडूप / नांदेड / जळगांव / बारामती.

E:\Backup Of Meena\D Drive\kam B on\medical camp.doc